**आदीवासी पाड्यातील ग्रामीण महिला व पशुपालक शेतकरी यांच्याकरिता दुग्धव्यवसाय व प्रक्रिया उद्योग प्रशिक्षण संपन्न”**

कृषि विज्ञान केंद्र, धुळे येथे एक दिवसीय प्रशिक्षण कार्यक्रम संपन्न झाला. या प्रशिक्षणाचे आयोजन कृषि विज्ञान केंद्र, धुळे, विभागीय विस्तार केंद्र धुळे व कृषि विज्ञान केंद्र, नंदुरबार यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले होते. शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करण्याच्या दृष्टिने व ग्रामीण भागातील युवकांना स्थानिक गरजेनुसार शेतीपुरक उत्पादन प्रक्रिया प्रशिक्षण देण्यासाठी तसेच ग्रामीण भागात रोजगारांच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी नंदुरबार जिल्ह्यातील आदीवासी भागातील महिला व पाशुपालक शेतकरी यांना कौशल्य आधारित प्रशिक्षण देणे या मुख्य उदेशाने दुग्ध व्यवसाय व प्रक्रिया उद्योग या विषयावर उपस्थित महिला व पशुपालक शेतकरी यांना प्रशिक्षणाद्वारे मार्गदर्शन करण्यात आले.

कृषि विज्ञान केंद्राचे, डॉ. धनराज चौधरी, विषय विशेषज्ञ, पशुसंवर्धन व दुग्धशास्त्र यांनी या व्यवसायाविषयी तांत्रिक माहिती अवगत करून दिली यामध्ये प्रामुख्याने दुग्ध व्यवसाय प्रक्रिया उद्योग यासाठी असणा-या संधी तसेच प्रत्यक्ष प्रात्यक्षिक माध्यमातून उपस्थित प्रशिक्षणार्थींना मार्गदर्शन केले या प्रशिक्षणात दुग्ध जन्य पदार्थ निर्मीती तंत्रज्ञान यामध्ये कलाकंद उत्पादन, पनीर उत्पादन, सुगंधी दुध, दही, चक्का, श्रिखंड, आम्रखंड, लस्सी, व्हे कोला इ. पदार्थ प्रत्यक्ष प्रात्यक्षिकातून दुग्धजन्य पदार्थ उत्पादन तंत्रज्ञान विषयी मार्गदर्शन करण्यात आले यासोबतच प्रशिक्षणामध्ये उपलब्ध बाजारपेठा, दुग्ध व्यवसायात कार्यरत असलेल्या शासकीय, निमशासकीय सहकारी संस्था याविषयी माहिती देण्यात आली.

प्रशिक्षण वर्गाच्या समारोप सोहळयांच्या अध्यक्षस्थानी कृषि महाविद्यालय, धुळे चे सहयोगी अधिष्ठाता, डॉ. चिंतामणी देवकर, प्रमुख अतिथी डॉ. मिर्लींद अहिरे, विभाग प्रमुख, विस्तार शिक्षण, म.फु.कृ. वि. राहुरी, डॉ मुरलीधर महाजन, कृषि विद्यावेत्ता, वि.वि.कें, धुळे व कृषि विज्ञान केंद्राचे, कार्यक्रम समन्वयक, डॉ. दिनेश नांद्रे तसेच डॉ. धिरज कंखरे, सहयोगी प्राध्यापक, पशुसंवर्धन व दुग्ध शास्त्र विभाग, क.म.वि.धुळे, श्रीमती अमृता राऊत, कृ.वि.कें.,धुळे आदी उपस्थित होते. सदर समारोपिय कार्यक्रमाचे सुत्रसंचालन डॉ. धनराज चौधरी व आभार प्रदर्शन डॉ. पंकज पाटील यांनी केले.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेकरिता कृषि विज्ञान केंद्र, धुळे, विभागीय विस्तार केंद्र, धुळे व कृषि विज्ञान केंद्र, नंदुरबार येथील सर्व अधिकारी व कर्मचारी यांचे सहकार्य मिळाले.

---

संपादक,
मा. महोदय
---------------------
---------------------

उपरोक्त बातमी आपल्या स्थानिक लोकप्रिय वृत्तपत्र दैनिकातून प्रकाशित करण्यात यावी.

**स्वा.**
**कार्यक्रम समन्वयक**
**कृषि विज्ञान केंद्र, धुळे**



प्रशिक्षणार्थींना दुग्धजन्य पदार्थाचे प्रात्यक्षिक करून दाखवितांना डॉ. धनराज चौधरी